मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दि.27 फेब्रुवारी 2026 | पान- 1


# नियमभंग करणाऱ्या आस्थापनांवर कठोर कारवाईचा इशारा!

## पिंपरी चिंचवड महापालिकेत प्रदूषण नियंत्रण व वायू गुणवत्तावाढीसाठीच्या उपाययोजनांचा आढावा...

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनानुसार शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. महापालिकेतील विविध विभागांनी समन्वयाने काम करून प्रदूषण नियंत्रणाची गती वाढवावी तसेच प्रदूषणाशी संबंधित नियमावलीची व्यापक जनजागृती करण्यात यावी, असे स्पष्ट निर्देश या बैठकीत अतिरिक्त आयुक्त सांडभोर यांनी दिले.

महापालिका मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, आरोग्य कार्यकारी अधिकारी किरणकुमार मोरे, कार्यकारी अभियंता सोहन निकम, योगेश आल्हाट, सुर्यकांत मोहिते, उप अभियंता पंकज धेंडे, प्रीती गाडे, अशोक मोरे, संजय चव्हाण तसेच पर्यावरण विभाग, स्थापत्य विभाग, बांधकाम परवाना विभाग आणि आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

( उर्वरित पान २ वर )



### उपद्रव शोध पथकांद्वारे शहरभर तपासणी व दंडात्मक कारवाई....

» पिंपरी चिंचवड महापालिकेतर्फे प्रदूषण आणि स्वच्छतेसंदर्भातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर सातत्यपूर्ण आणि कठोर कारवाई करण्यासाठी दोन विशेष उपद्रव शोध पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. फेब्रुवारी २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत रस्त्यावर किंवा नदीकाठी कचरा टाकणे, सांडपाणी प्रक्रिया न करता नदीत सोडणे, कचरा जाळणे व प्लास्टिकचा गैरवापर, सार्वजनिक ठिकाणी घाण करणे, तसेच जैववैद्यकीय किंवा ई-कचऱ्याची अनियमित विल्हेवाट आणि बांधकाम राडारोडा टाकणे या विविध कारणांवरून महापालिकेने शहरभरातील एकूण ४ हजार ८५३ आस्थापनांवर कारवाई करण्यात आली असून २ कोटी ५९ लाख ६ हजार २०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

“ पिंपरी चिंचवड शहरातील बांधकाम व औद्योगिक आस्थापनांनी ग्रॅप अंतर्गत सर्व नियमांचे शंभर टक्के पालन करणे अत्यावश्यक आहे. धूळ नियंत्रण, उत्सर्जन व्यवस्थापन आणि स्वच्छतेसंदर्भातील कोणतीही ढिलाई स्वीकारली जाणार नाही. महापालिका प्रदूषण नियंत्रणाबाबत कठोर भूमिका घेत असून नियमभंग करणाऱ्यांवर त्वरित कारवाई केली जाईल. सर्व विभागांनी समन्वयाने व जलद गतीने कार्य करून शहराच्या वायू गुणवत्तेमध्ये अधिक सुधारणा घडवणे हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे.

- तृप्ती सांडभोर, अतिरिक आयुक्त,
पिंपरी चिंचवड महापालिका..

“ बांधकाम प्रकल्प आणि आरएमसी प्लॅटवर प्रदूषण नियंत्रणासाठीच्या उपाययोजना राबवाव्यात. उपद्रव शोध पथकांनी केलेली कारवाई आणि वसूल केलेला दंड हे शहरातील शिस्तबद्धता वाढविण्यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. पुढील काळात आम्ही तपासणी अधिक मजबूत करणार असून नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी सर्व संबंधित आस्थापनांकडून संपूर्ण सहकार्याची अपेक्षा आहे.

- संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता,
पिंपरी चिंचवड महापालिक

---

# पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात 'या' कालावधीसाठी कलम 37 (1) व (3) आदेश जारी

## शस्त्र बाळगणे, मिरवणुका व परवानगीशिवाय सभा घेण्यास बंदी; आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाईचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी पोलीस सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, यांनी प्राप्त अधिकाराचा वापर करुन व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात 4 मार्च 2026 रोजी 00.01 पासून ते 17 मार्च 2026 रोजी 24 वाजेपर्यंत खाली नमूद केलेली कृत्य करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे.




कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे. दगड अथवा शस्त्रे किवा अस्खे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे. शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे. कोणत्याही इसमाचे चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढा-यांचे चित्राचे प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे. मोठ्याने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे. ज्यामुळे सभ्यता अगर नितिमत्ता यास धोका पोहचेल किवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे किवा अविर्भाव करणे कोणतेही जिन्नस तयार करुन त्याचा जनतेत प्रसार करणे. ज्या योगे वरील परिसरात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पध्दतीने कलम 37(1) व (3) विरुध्द वर्तन करणे. कलम 37 चे पोटकलम (3) अन्वये पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करणे, तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणे किंवा मिरवणुका काढणेस बंदी घालण्यात येत आहे.

वरील संपूर्ण आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरीष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार वाळगणे आवश्यक आहे व त्याबबात परवानगी आहे त्यांना लागू होणार नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 135 प्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

# माता रमाई स्मारकाचे भूमिपूजन 11 एप्रिल रोजी होणार : महापौर रवि लांडगे

## फुले–आंबेडकर जयंतीनिमित्त महापालिकेची नियोजन बैठक; युवक, महिला सहभाग वाढविण्यावर भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता, सामाजिक समता, शिक्षणाचे महत्त्व आणि संविधानिक मूल्यांची जोपासणे करणे, विचार प्रबोधन पर्वाच्या माध्यमातून युवकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक सलोखा आणि लोकशाही मूल्यांची रुजवणूक होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी व्याख्याने, परिसंवाद, ग्रंथप्रदर्शने, चित्रफिती, नाट्यप्रयोग तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रम राबविण्याची गरज असल्याचे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात येते. या पर्वाच्या नियोजनासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुख्यालयातील मधुकर



पवळे सभागृहात महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील सामाजिक संघटनांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, सभागृह नेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य धर्मपाल तंतरपाळे, डॉ. सुहास कांबळे, नगर सदस्या सारिका मासुळकर, माजी नगरसेवक मारुती भापकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सामाजिक कार्यकर्ते संतोष जोगदंड, बाळासाहेब रोकडे, अंजना गायकवाड, मंदाकिनी गायकवाड, विशाल ओव्हळ, सिद्धार्थ बनसोडे, विजय जाधव, जितेंद्र मोटे, विनोद सरवदे, दगडू गायकवाड, बापूसाहेब गायकवाड, उत्तम कांबळे, लक्ष्मण माने, धीरज वानखेडे, प्रकाश भुक्तर, अभिजित चव्हाण, माणिक शिंदे, गौतम कांबळे, नदीम शेख, बळीराम काकडे, सचिन गायकवाड, ब्रम्हानंद जाधव, अक्ष भालेराव, कैलाश शिंदे, संतोष शिंदे, रघु बनसोडे, महेंद्र सरवदे, राहुल सोनवणे, युवराज तिकोणे, गणेश भोसले, तुकाराम गायकवाड, कविता पालटवाड यांच्यासह अनेक सामाजिक संघटनाचे सदस्य उपस्थित होते.

या बैठकीत सभागृह नेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगर सदस्य डॉ. सुहास कांबळे यांनी उपस्थित नागरिकांना महात्मा जोतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य पुढे घेऊन जाण्यासाठी आम्ही शहरातील नागरिकांच्या सोबत असल्याचे सांगितले.

विचार प्रबोधन पर्व हे केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता सर्वसामान्य नागरिकांपर्यंत विचारांची चळवळ पोहोचवणारे प्रभावी व्यासपीठ कसे बनेल, याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीदरम्यान विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी कार्यक्रमांच्या रूपरेषेबाबत सूचना केल्या. स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते, अभ्यासक व वक्ते यांना संधी देणे, तसेच महिलांचा व युवकांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्याची मागणी करण्यात आली. तसेच विचार प्रबोधन पर्वाच्या आयोजनासाठी संयुक्त नियोजन समिती स्थापन करणे, वेळापत्रक व कार्यक्रमांचे नियोजन वेळेत जाहीर करणे, तसेच प्रसिद्धी-प्रसारासाठी आधुनिक माध्यमांचा वापर करण्याबाबत उपस्थितांनी सूचना मांडल्या.

याशिवाय बैठकीस महापालिकेचे अधिकारी, विविध विभागांचे प्रतिनिधी तसेच शहरातील अनेक नामवंत सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. विचार प्रबोधन पर्वाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### माता रमाई स्मारकाचे भूमिपूजन

**» या बैठकीत शहरात दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर स्मारकाच्या प्रश्नाकडे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील सामाजिक कार्यकर्त्यांनी लक्ष वेधले. सामाजिक व ऐतिहासिक दृष्टिकोनातून त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करत स्मारकाच्या उभारणीस तातडीने सुरुवात करण्याची मागणी बैठकीत करण्यात आली.यासंदर्भात महापौर रवि लांडगे यांनी शहरातील नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन माता रमाई आंबेडकर स्मारकाच्या उभारणीसाठी येत्या ११ एप्रिल रोजी भूमिपूजन करण्यात येणार असल्याचे या बैठकीत जाहीर केले.**

---

# रक्षक चौकातील उड्डाणपूलाचा उतार कमी करा

## खासदार श्रीरंग बारणे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

औंध-रावेत बीआरटी रोडवरील रक्षक चौकात उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. उड्डाणपूल उभारताना कंत्राटदाराने उताराच्या तांत्रिक बाबीकडे पुरेसे लक्ष दिलेले दिसत नाही. तीव्र उतारामुळे भविष्यात अपघात होऊ शकतात. त्यासाठी या उड्डाणपुलाची लांबी वाढवून उतार कमी करण्याचे निर्देश शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिले आहेत. उपययोजना न करता पूल खुला केल्यास आणि भविष्यात पुलावरील उतारावरुन पडल्याने अपघात झाल्यास कन्सल्टंट, अधिकाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याचा इशारा खासदार बारणे यांनी दिला आहे.



खासदार बारणे यांनी गुरुवारी प्रत्यक्ष पुलाच्या कामाची पाहणी केली. इंफ्राकिंग कन्सल्टिंग प्रा. लि. कंपनीचे सीईओ डॉ. संजय नाईक, महापालिकेच्या सह शहर अभियंता प्रेरणा सिनकर, कार्यकारी अभियंता सुनिल पवार, कार्यकारी अभियंता संध्या वाघ, उपअभियंता निलेश दाते, प्रोजेक्ट मॅनेजर धनाजी मिसाळ, कनिष्ठ अभियंता प्रणिता पिंजन यावेळी उपस्थित होते. खासदार बारणे म्हणाले, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने औंध-रावेत बीआरटी रोडवरील रक्षक चौकात सध्या उड्डाणपुलाचे काम सुरु आहे. हे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. परंतु, पुलाची पाहणी केली असता पुलाचा दोन्ही बाजूंचा उतार अत्यंत तीव्र आहे. उताराचा भाग तुलनेने अधिक असल्याने भविष्यात अपघाताची शक्यता टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेणे अत्यावश्यक आहे. यापूर्वी निगडी येथील मधुकर पवळे उड्डाणपुलाचा उत्तारही असाच तीव्र झाल्याने तिथे सातत्याने अपघात होतात. या कामासाठी झालेला खर्च, कामाची सुरुवात आणि तांत्रिक माहिती यांचा आढावा घेऊन तात्काळ दुरुस्तीचे आदेश द्यावेत, अशी सूचना खासदार बारणे यांनी केली आहे.

---

# नियमभंग करणाऱ्या आस्थापनांवर कठोर कारवाईचा इशारा!

( पान १ वरून )

बैठकीत उपद्रव शोध पथकातील मनुष्यबळात वाढ करून शहरातील प्रत्येक बांधकाम प्रकल्प, रेडी मिक्स काँक्रिट प्लांट आणि औद्योगिक परिसरांना अधिकाधिक भेट द्यावी, असे निर्देश देण्यात आले. संबंधित ठिकाणी ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन (ग्रॅप) मधील नियमांचे पालन होते का, याची तपासणी करून नियमभंग करणाऱ्यांवर त्वरित दंडात्मक कारवाई तसेच कठोर प्रशासकीय उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

शहरातील बांधकाम स्थळांवरून उडणारी धूळ आणि औद्योगिक क्षेत्रातील उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्यासाठी बांधकाम प्रकल्प आणि आरएमसी प्लांटवर एक्यूआय मॉनिटरिंग सिस्टीम बसविणे अनिवार्य आहे त्यानुसार त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. जेणेकरून त्या परिसरातील प्रत्यक्ष वायू गुणवत्ता सतत मोजण्यास मदत होईल आणि नियमांचे पालन अधिक प्रभावीपणे सुनिश्चित करता येईल, हे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्यातर्फे महापालिकेच्या संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रदूषण नियंत्रणाशी निगडित नियम, जबाबदाऱ्या आणि अंमलबजावणी प्रक्रियेबाबत विशेषतः संवेदनशील करण्यात आले. तसेच शहरातील सर्व नागरी आणि व्यावसायिक आस्थापना, बांधकाम, औद्योगिक क्षेत्र तसेच दैनंदिन कामकाजाशी संबंधित प्रत्येक घटकापर्यंत प्रदूषणासंदर्भातील नियमावलीची माहिती देण्याच्या अनुषंगाने जनजागृतीवर अधिकाधिक भर द्यावा असेही सांगितले.

# नियम मोडणाऱ्या पुणेकरांवर वाहतूक विभागाची कडक कारवाई

## ई-चलन दुर्लक्षित करणाऱ्यांवर कारवाई; महिनाभरात दंड न भरल्यास परवाना धोक्यात

**पुणे | प्रतिनिधी**

बेशिस्त वाहन चालकांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यात येते. कारवाई केल्यानंतर अनेकांनी थकीत दंड भरला नसल्याचे उघडकीस आले आहे. वाहनचालकांनी येत्या ३० दिवसांत थकीत दंड न भरल्यास वाहन परवाना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या बाबतचा प्रस्ताव प्रादेशिक परिवहन विभागाकडे (आरटीओ) सादर करण्यात येणार आहे. थकीत दंड वसुलीसाठी वाहतूक पोलिसांकडून विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे.

बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मार्च २०१९ पासून ई-चलन सुविधेद्वारे बेशिस्त वाहनचालकांनी दंडात्मक कारवाईचे संदेश पाठविण्यास सुरुवात झाली. वाहतूक पोलिसांनी ई-चलन पाठविल्यनंतर अनेक वाहनचालकांनी दुर्लक्ष केले. थकीत दंड भरण्यासाठी वाहतूक पोलिसांनी वेळोवेळी आवाहन केले. मात्र, अनेक वाहनचालकांनी अद्याप थकीत दंड भरलेला नाही.

वाहनचालकांकडून थकीत दंड वसूल करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत शहरातील प्रमुख चौकात वाहतूक पोलिसांची नियुक्ती केली करण्यात येणार आहे. येत्या महिनाभरात थकीत दंडाची वसुली करण्यासाठी पोलिसांकडून ही मोहीम प्रभावी पद्धतीने राबविण्यात येणार आहे. थकीत दंडाबाबतची नोटीस वाहनचालकांना पाठविण्यात येणा असून, संबंधित नोटीस मिळाल्यानंतर महिनाभरात ही रक्कम भरणे गरजेचे आहे, अशी माहिती वाहतूक पोलिसांनी दिली.



### कायदेशीर कारवाईचा इशारा

» थकीत दंड भरण्याबाबत वाहनचालकांना नोटीस बजाविण्यात येणार आहे. दंड न भरल्यास वाहन परवाना रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव प्रादेशिक परिवहन विभागाकडे पाठविण्यात येणार आहे. या बाबत न्यायालयात खटलाही दाखल करण्यात येणार आहे. संबंधित नोटीस वाहनमालकाच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर 'MHPECH-G' या अधिकृत शॉर्ट कोडवरून मोबाइल संदेशाद्वारे (एसएमएस) पाठविण्यात येणार आहे. ही नोटीस २६, २७, २८ फेब्रुवारी २०२६ आणि १ मार्च २०२६ या कालावधीत पाठविण्यात येणार आहे. या कालावधीव्यतिरिक्त वाहतूक पोलिसांच्या नावाने संदेश आल्यास तो संशयास्पद समजावा, अशी माहिती वाहतूक पोलिसांनी दिली.

### दंड भरण्याची सुविधा

» वाहतूक पोलिसांच्या अधिकृत संकेतस्थळावरून 'https://mahatrafficechallan.gov.in' भरावा. तसेच पुणे ट्रॅफिक पोलीस अ‍ॅप (पीटीपी अ‍ॅप) दंड भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वाहनचालकांनी जवळच्या वाहतूक विभाग कार्यालयात ई-चलन यंत्राचा वापर करून क्यूआर कोड, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्डचा वापर करुन दंडाची रक्कम भरू शकतात.

### वाहतूक पोलिसांचे आवाहन

» वाहतूक पोलिसांकडून दंडात्मक कारवाईचे संदेश एपीके फाईलच्या माध्यमातून पाठविले जात नाहीत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. एपीके फाईल स्वरूपात कोणताही संदेश आल्यास त्याकडे काणाडोळा करावा आणि तो डाउनलोड करू नये. अधिकृत नोटिशीत नमूद केलेल्या पेमेंट पद्धतीचाच वापर करावा. कोणालाही ओटीपी किंवा बँक संबंधित माहिती देऊ नये, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

> “थकीत दंडवसुली हा एकमेव उद्देश या मोहिमेमागचा नाही. बेशिस्त वाहनचालकांमुळे अपघात होतात. त्यांना शिस्त लावण्यासाठी ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.
> - मनोज पाटील, अतिरिक्त पोलीस आयुक्त.

# महिला सक्षमीकरणाला चालना; राणी लक्ष्मीबाई योजनेला नव्याने सुरुवात

## 4 कोटींची कामे दोन ठेकेदारांना; तीन वर्षांनंतर महिला सक्षमीकरण योजना पुन्हा चर्चेत

**पुणे | प्रतिनिधी**

प्रशासक काळात तीन वर्षे महिला सक्षमीकरणाचा विसर पडलेल्या महापालिका प्रशासनाला अचानक जाग आल्याचे दिसत आहे. समाज विकास विभागाच्या माध्यमातून प्रत्येक प्रभागासाठी तब्बल १० लाख रुपये खर्च करून राणी लक्ष्मीबाई महिला सक्षमीकरण योजना राबविण्यात येणार आहे. त्यासाठी १५ क्षेत्रीय कार्यालयनिहाय प्रत्येकी ३० लाख रुपयांच्या निविदा प्रशासनाकडून काढण्यात आल्या आहेत.

केवळ दोनच निविदाधारक पात्र ठरल्याने त्यांच्यात ही कामे विभागून देण्यात येणार असून, त्यासाठीचे १५ प्रस्ताव प्रशासनाने मंगळवारी स्थायी समितीत आयत्यावेळी दाखल केले आहेत. विशेष म्हणजे चार ते पाच महिन्यांपूर्वीच ही निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती, तसेच त्यासंबंधीचे प्रस्ताव तयार करून महापालिका आयुक्तांच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. मात्र, मंगळवारी अचानक जाग आल्याप्रमाणे प्रशासनाने हे प्रस्ताव स्थायी समितीत दाखल केले. त्यामुळे प्रशासनाची ही घाई नेमकी कोणासाठी आहे, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.




### निविदांमध्ये दोनच ठेकेदार पात्र

» प्रशासनाकडून स्थायी समितीत ठेवण्यात आलेल्या प्रस्तावानुसार समाज विकास विभागामार्फत या उपक्रमासाठीची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. त्यामध्ये केवळ तीनच ठेकेदारांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी एक ठेकेदार अपात्र ठरल्याने दोन ठेकेदारांमध्येच या योजनेची कामे विभागून देण्यात आली आहेत. विशेष म्हणजे यातील एका ठेकेदाराने आठ निविदांसाठी १० ते १५ टक्के कमी दराने निविदा सादर केल्या आहेत, तर त्याच निविदांसाठी दुसऱ्या ठेकेदाराने केवळ १ ते ३ टक्के कमी दर दाखविला आहे.

### काय आहे योजना

» राणी लक्ष्मीबाई योजना २०१६ पासून तत्कालीन स्थायी समिती अध्यक्षा अश्विनी कदम यांनी सुरू केली होती. या योजनेअंतर्गत महापालिका हद्दीतील महिलांच्या सक्षमीकरण व उन्नतीसाठी प्रत्येक प्रभागनिहाय विविध उपक्रम राबविले जातात. त्यामध्ये शिक्षण, प्रशिक्षण, क्षमता बांधणी, महिलांसाठी वॉर्ड स्तरावर आरोग्य शिबिरे, आरोग्य तपासण्या आदी कार्यक्रमांचा समावेश असतो. २०२० नंतर कोरोना संकटाचे कारण देत प्रशासनाने ही योजना राबविली नव्हती, तसेच प्रशासक कालावधीत ती पूर्णपणे बंद ठेवली होती. मात्र, चालू वर्षात अचानक पुन्हा या योजनेचा प्रस्ताव पुढे आणला आहे.

# नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे मार्गासाठी मुख्यमंत्र्यांची घोषणा

## जीएमआरटी अडथळ्यावर तोडगा शोधण्यासाठी तज्ज्ञ समिती; मूळ मार्गिकेचा पर्याय तपासणार


**पुणे | प्रतिनिधी**

पुणे -नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे मार्ग आणि औद्योगिक महामार्ग जोडणी याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी आणि शेतकऱ्यांच्या प्रस्तावाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तज्ज्ञ समिती नेमण्यात येणार असल्याची घोषणा बुधवारी विधिमंडळाच्या अधिवेशनात केली. तसेच अर्थसंकल्प सत्रात या प्रकल्पांना पुढील टप्प्यात नेहण्याचा निर्णयही घेतला जाईल, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

पुणे-नाशिक 'सेमी हायस्पीड' रेल्वे प्रकल्पाच्या मार्गात प्रमुख अडथळा ठरणाऱ्या जागतिक वैज्ञानिक संशोधन केंद्र – 'जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोप' (जीएमआरटी) प्रकल्पामुळे केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांनी अहिल्यानगर, शिर्डी मार्गे हा मार्गाला मंजुरी देत जुना प्रस्ताव रद्द केला. त्यामुळे सिन्नर, संगमनेर आणि इतर भागातील लोकप्रतिनिधी, स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली. याबाबत राष्ट्रीय महामार्ग रोखून आंदोलन करण्यात आले असून केंद्रीय मंत्र्यांकडे निवेदन देण्यात आले आहे. याबाबत जन आंदोलन होत असताना बुधवारी आमदार सत्यजीत तांबे यांनी विधिमंडळात जुन्या मार्गिकेबाबतच्या जनभावनेचा आदर आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने विचार करून निर्णयाबाबत प्रश्न उपस्थित केला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, 'पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. (महारेल) यांच्याकडूनच करण्यात आला होता. हा अहवाल केंद्र सरकारकडे पाठविल्यानंतर त्यावर आक्षेप घेण्यात आला. त्यानंतर मी स्वत: याबाबत वारंवार पाठपुरावा केला असताना याबाबत मान्यता मिळाली नाही. केंद्र सरकारकडून जीएमआरटी प्रकल्प अत्यंत महत्वाचा असून यामध्ये ३२ देशांसाठी महत्वाची आहे. जीएमआरटीचे स्थलांतर शक्य नसल्याचे सांगत या मार्गाल नकार देण्यात आला आहे.'

त्यामुळे केंद्राच्या निर्णयानुसार मार्गाबाबत बदल करता येणार नसले, तरी रेल्वे मंत्र्यांशी बोलून जीएमआरटी प्रकल्पाला धक्का न लागता वेगळा बफर झोन तयार करून मार्गिका जाऊ शकते किंवा नाही याबाबत तज्ज्ञ सल्लागारांची नेमणूक करण्यात येईल. या समितीला तीन ते चार महिन्यांचा कालावधी देऊन निष्कर्षाअंती निर्णय घेण्यात येईल, असे फडणवीस यांनी नमूद केले.



### आंदोलन आणि स्थानिकांची भूमिका

» पुणे–नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पाच्या मार्गात बदल करण्यात आल्यानंतर सिन्नर, संगमनेर आणि परिसरातील लोकप्रतिनिधी व नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. जीएमआरटी प्रकल्पामुळे जुनी मार्गिका रद्द करून अहिल्यानगर–शिर्डी मार्गे पर्यायी मार्गास मंजुरी देण्यात आली. या निर्णयाविरोधात स्थानिकांनी राष्ट्रीय महामार्ग रोखून आंदोलन केले तसेच केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे निवेदन सादर केले. आमदार सत्यजीत तांबे यांनीही विधिमंडळात जनभावनांचा आदर राखून आर्थिक विकासाच्या दृष्टीने जुन्या मार्गिकेचा पुनर्विचार करण्याची मागणी केली.

### सरकारची भूमिका आणि पुढील दिशा

» मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात स्पष्ट केले की, सविस्तर प्रकल्प अहवाल महारेलकडून तयार करून केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला होता; मात्र जीएमआरटी प्रकल्पाच्या संवेदनशीलतेमुळे त्यावर आक्षेप घेण्यात आला. केंद्राच्या निर्णयानुसार मार्गात बदल करणे कठीण असले, तरी जीएमआरटीला धक्का न लावता बफर झोन तयार करून पर्यायी मार्ग शक्य आहे का, यासाठी तज्ज्ञ समिती नेमली जाईल. या समितीला तीन ते चार महिन्यांचा कालावधी दिला जाणार असून अहवालानंतर पुढील निर्णय घेतला जाईल.

> रेल्वे प्रशासनाने केलेल्या अहवालानुसार केंद्र सरकारने सर्व तपासणी करूनच जीएमआरटी प्रकल्पात अडथळा निर्माण होऊ नये, म्हणून मार्गिका बदलण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, सरळ मार्ग प्रकल्प नेहण्यासाठी राज्य सरकारचीही आग्रही भूमिका असून हा अडथळा कसा दूर होईल, स्थानिक गावांना कसा फायदा होईल, या भूमिकेतून तज्ज्ञ सल्लागारांची समिती नेमण्यात येत आहे.
>
> - देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

# देशात पहिल्यांदाच प्रयोग! भीमाशंकरमध्ये 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'ची तयारी

## 288 कोटींच्या विकास आराखड्यांतर्गत कामांना वेग; पारंपरिक स्थापत्यशैलीतून पुरातत्त्व विभागाचा प्रकल्प

**पुणे | प्रतिनिधी**

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथील मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येत आहे. सुमारे पावणेतीन हजार चौरस फुटांच्या सभामंडपाचे काम केवळ चार महिन्यांत पारंपरिक तंत्रज्ञानाचा वापर करून पूर्ण करण्यात येणार आहे. देशात पहिल्यांदाच अशा स्वरूपाचे जीर्णोद्धाराचे काम पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात येत असून, दगडातील या बांधकामाचा गिनिज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये समाविष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे.

खेड तालुक्यातील भीमाशंकर ज्योतिर्लिंगाच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास राज्य सरकारने यापूर्वीच मान्यता दिली आहे. यासाठी २८८ कोटी १७ लाख रुपयांची मदत राज्य सरकारकडून केली जाणार आहे. केवळ सभामंडपासाठी १० कोटी रुपयांचा खर्च करण्यात येत आहे. कमी वेळेत पारंपरिक साहित्य व तंत्रांचा वापर करून, उत्कृष्ट कारागिरीच्या साहाय्याने पूर्ण झालेला हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर आदर्श ठरणार असून, याची जागतिक पातळीवर नोंद व्हावी, यासाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी अर्ज करण्यात येणार आहे. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथील मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येत आहे. सुमारे पावणेतीन हजार चौरस फुटांच्या सभामंडपाचे काम केवळ चार महिन्यांत पारंपरिक तंत्रज्ञानाचा वापर करून पूर्ण करण्यात येणार आहे.



### सभामंडपाची रचना

» या सभामंडपात एकूण ४८ स्तंभ असून, मध्यभागी घुमट तयार करण्यात येणार आहे. या सभामंडपाचे एकूण क्षेत्र २ हजार ७५० चौरस फूट इतके असेल. यातील स्तंभ दोन ते तीन दगडांमध्ये पूर्ण करण्यात येणार असून, स्तंभांवर कमानी उभारल्या जाणार आहेत. त्याही तीन दगडांमध्येच पूर्ण करण्यात येणार आहेत. त्यावर असलेला घुमटदेखील तशाच पद्धतीने उभारला जाणार आहे. हा सभा मंडप तयार करण्यासाठी केवळ चार महिन्यांचा कालावधी लागणार असून, हे काम विक्रमी वेळेत पूर्ण करण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे.

> "भीमाशंकर मंदिराच्या कामाचा गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड समावेश होणे केवळ पुण्याच्याच नव्हे, तर राज्याच्या व देशाच्या दृष्टीने अभिमानास्पद आहे. त्यासाठी लवकरच सल्लागाराची नेमणूक करण्यात येणार असून, गिनिज वर्ल्ड रेकॉर्डचे पदाधिकारीही याला अनुकूल आहेत."
>
> - जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी, पुणे